## उल्हासनगर महानगरपालिका

मालमत्ता कर विभाग

मुख्य कार्यालय, महापालिका, उल्हासनगर-४२१ ००३ जिल्हा ठाणे, महाराष्ट्र

Tel No - 95251-2720116/125 Ext No 238 Fax No 95251-2720104


जा क्र उमपा/कर विभाग/यु-६/३९ /२०२२ दिनांक / / २०२३

संदर्भ- १)विशेष नोटीस क्र उमपा/कर विभाग/यु ६/३९/८९ दिनांक १३/०६/२०२३

२) मे.महानेदान फेलोशिप चॅरिटेबल ट्रस्ट, पंचशिल नगर,उल्हासनगर-४ यांनी दि. ०३/०८/२०२३ रोजी दाखल केलेली हरकत (ना.सु.केंद्र टोकन नं ४१२०२३०००१३४५९)

३)जा.क्र.उमपा/कर विभाग/८९ दिनांक १७/०८/२०२३ रोजीची सुनावणी नोटीस

४)सुनावणी दिनांक २३/०८ /२०२३

**सादर**

उल्हासनगर महानगरपालिका कर आकारणी पुस्तकात मालमत्ता क्र **39DO008417000**(पंचशिल नगर,उल्हासनगर-४) अन्वये नोंद असलेल्या मिळकतीकरीता कर निर्धारणासंबंधी संदर्भ क्र १ अन्वये विशेष नोटीस बजावण्यात आली आहे

उक्त नोटीसच्या अनुषंगाने संदर्भ क्र २ अन्वये कर आकारणी जास्त आहे. ती मान्य नसल्यामुळे सदरची कर आकारणी दुरुस्त करावी अशी हरकत दाखल केली आहे

उक्त हरकतीच्या अनुषंगाने संदर्भ क्र ३ नुसार संबंधितास दिनांक २३/०८ /२०२३ रोजी सुनावणीस उपस्थित राहणेबाबत नोटीस बजावण्यात आली आहे

दिनांक २३/०८ /२०२३ रोजी सुनावणीस मे.महानेदान फेलोशिप चॅरिटेबल ट्रस्ट , सदस्य हे हजर आहेत.त्यांनी संदर्भ क्र २ नुसार मिळकत बांधकाम शास्ती रद्द करून सदरची आकारणी सुधारीत करावी असे निवेदन सादर केले आहे

संदर्भिय मिळकतीचे क्षेत्रफळ, वापर, बांधकाम प्रकार विशेष नोटीसप्रमाणे व मंजुर बांधकाम नकाशासोबत प्रत्यक्षातील बांधकाम याची पडताळणी केलेली आहे. सबब, मे.महानेदान फेलोशिप चॅरिटेबल ट्रस्ट यांनी दाखल केलेली हरकत मान्य करून उल्हासनगर महानगरपालिका कर आकारणी पुस्तकात मालमत्ता क्र **39DO008417000**(पंचशिल नगर,उल्हासनगर-४) अन्वये नोंद असलेल्या मिळकतीकरीता अवैध शास्ती रद्द करून कर आकारणी कायम करणेस शिफारस करण्यात आली आहे

यास्तव मी पुढीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे

## आदेश

१)मे.महानेदान फेलोशिप चॅरिटेबल ट्रस्ट यांनी दाखल केलेली हरकत मान्य करण्यात येत आहे

२) त्याअनुषंगाने उल्हासनगर महानगरपालिका कर आकारणी पुस्तकात मालमत्ता क्र **39DO008417000**(पंचशिल नगर,उल्हासनगर-४)अन्वये नोंद असलेल्या मिळकतीकरीता बांधकाम शास्ती रद्द करून निश्चित करण्यात आलेले करयोग्य मुल्य व आकारणी कायम करण्यात यावी.

(प्रियंका राजपूत)
उप आयुक्त (कर)
उल्हासनगर महानगरपालिका

प्रति,

१) मे कोल्ब्रो ग्रुप, नागपुर

२) मे.महानेदान फेलोशिप चॅरिटेबल ट्रस्ट, पंचशिल नगर,उल्हासनगर-४

Scanned with CamScanner